# प्रेस नोट दिनांक ०६/०८/२०१८

## मौजमजेसाठी वाहन चोरी करणारे ५ अल्पवयीन मुलांना उत्तमनगर पोलीसांनी पकडले

उत्तमनगर पो स्टे तपास पथकातील पोना ६७०६ तनपुरे व पोशि ८१५९ ताकवणे पोशि ७४२१ ढमढेरे हे दिनांक - ३१/०७/२०१८ रोजी पॅट्रोलिंग दरम्यान अचानक चौक उत्तमनगर येथून जात असताना काळया रंगाची ॲक्टीव्हा क्र एम एच १२ जी एच ९३१२ वरुन एक अल्पवयीन मुलगा घेऊन जात असताना त्यांना दिसला. सदर गाडीचा नंबर संशयास्पद वाटल्याने त्यास थांबवून स्वतःजवळील मोबाईल ॲप मधून गाडीच्या नंबरवरुन चेक केले असता मूळ नंबर एम एच १२ एच जी ६३१२ असा असल्याचे आढळून आले. म्हणून त्यास ताब्यात घेवून उत्तमनगर पोलीस स्टेशन येथे आणून चौकशी करता सदर ॲक्टीव्हा ही सुमारे ३ महिन्यापुर्वी अहिरेगेट शिवणे पुणे येथून मित्रांचे मदतीने चोरल्याचे त्याने सांगितले. या बाबत उत्तमनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नं. ३४/२०१८ भादवि कलम ३७९ अन्वये दिनांक- २०/०४/२०१८ रोजी गुन्हा दाखल असल्याची खात्री झाल्याने त्याचेकडे अधिक तपास करता त्याचे आणखी ४ अल्पवयीन साथीदार यांचे मदतीने अशाच प्रकारे वारजे, उत्तमनगर परीसरामध्ये वाहनांची चोरी केल्याचे सांगितले. त्या प्रमाणे तपास करुन सर्व अल्पवयीन बालकांना ताब्यात घेतले व त्यांचेकडून **एकुण १,१५,०००/- रु.** किंमतीच्या **७ दुचाकी वाहने** असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एकुण ५ गुन्ह्यांची उकल करण्यात यश आले आहे. तसेच उर्वरीत वाहनांचे मालकांचा शोध सुरु आहे. सदर बालकांकडे चौकशी करता मौजमजेसाठी एकमेकांचे मदतीने वाहने चोरी करुन आपापसांत बदली करुन तसेच गाड्यांचे मूळ क्रमांकामध्ये फेरफार करुन वापरत असत. सर्व अल्पवयीन बालकांना त्यांचे पालकांचे ताब्यात देण्यात आले असून गुन्ह्याचा तपास अद्याप सुरु आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त, परीमंडळ १, मा. सहा. पोलीस आयुक्त डेक्कन विभाग पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली उत्तमनगरच्या वरीष्ठ पोलीस निरीक्षक अनघा देशपांडे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सतिश डहाळे, तपासपथकाचे पोउनि कोल्हे, सपोफौ वाघदंडे, पो.हवा. सुर्यवंशी, पोशि ताकवणे, पोना ६७०६ तनपुरे ,पोशि ७४२१ ढमढेरे, पोशि त्रिंबके यांनी पार पाडली आहे.

ता. ०६/०८/२०१८